International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण महिलांची सामजिक स्थिती यांचा समाजशास्त्रीय अभ्यास

**प्रा. पुनम सचिन काकड**
*समाजशास्त्र विभाग, के. टी. एच. एम. महाविद्यालय, नाशिक*
*Corresponding Author - प्रा. पुनम सचिन काकड*
**DOI - 10.5281/zenodo.10939307**

**प्रस्तावना :**

महिला सबलीकरण ही स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीने विकासाच्या संधी उपलब्ध करून देणारी, स्त्री अधिकाराचा पुरस्कार करणारी आणि स्त्री-पुरुष समानतेवर आधारीत नवीन व्यवस्था निर्मितीचे उद्दिष्ट ठेवणारी एक प्रक्रिया आहे. या प्रक्रियेमध्ये शारिरीक, मानसिक वा बौद्धिक विकास साधून त्यांना जीवनाच्या सामाजिक आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक क्षेत्रामध्ये पुरुषांच्या बरोबरीने समान हक्क आणि अधिकार मिळवून देण्याचा प्रयन केला जातो. स्त्री सक्षमीकरणाच्या संदर्भात आज विविध घटकांच्या माध्यमातून प्रयत्न केले गेलेले आहेत. अगदी छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून स्त्रियांना सन्मानाची वागणूक मिळावी आणि स्त्रियांचा उत्कर्ष व्हावा ही भूमिका निर्माण केली. त्यानंतरच्या कालखंडात राजर्षी शाहू महाराज महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, राजा राममोहन रॉय, महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर इत्यादी अनेक समाजसुधारक, विचारवंतांनी स्त्री स्वातंत्र्य आणि त्यांच्या सर्वांगिण विकासासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येते. या सर्वांना राष्ट्राभिमान, स्वातंत्र्य चळवळ, आणि सर्वांगिण शिक्षण या गोष्टीची जोड मिळाल्याने मोठया प्रमाणात स्त्रीयांवरील बंधने अन्याय, अत्याचार दूर होण्यास मदत झाली. अनेक वर्षापासून चूल आणि मूल या कार्यक्षेत्रात अडकलेल्या व माणुस म्हणूनही जगता येणारी आगतिकता वर्षानुवर्षे भोगणाऱ्या स्त्रीसाठी ही एक स्वातंत्र्याची पहाटच म्हणावी लागेल, महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेमुळे महिलांचे विविध क्षेत्रात कर्तुत्व दाखविण्याची संधी मिळू लागल्याने महिलांचे नेतृत्व उदयास येत आहे.

प्राचीन भारतात स्त्रियांना पुरुषांच्या बरोबरीचे स्थान होते. गार्गी मैत्रीयी व अत्रेयी यांना तर विदूषी म्हणून विद्वता सभेमध्ये मानाची जागा मिळत असे. प्राचीन भारतात स्त्रीचा मान राखला जात असे. पण मध्ययुगीन काळात परकीय आक्रमणे वाढली आणि सुरक्षित असलेली स्त्री असुरक्षित झाली, ब्रिटीश आणि स्वातंत्र्योत्तर काळात सुधारणेसाठी वेळोवेळी कायदे करण्यात आले. गेल्या पाच दशकात त्यामध्ये बदल झालेला

आपणास दिसतो आहे. महिला विविध क्षेत्रात आघाडीवर दिसू लागल्या असल्या तरी त्याआधी प्रमाण हे काही क्षेत्रात नगण्य अल्प व नाममात्र आहे. महिलांच्या क्षमतांचा उपयोग पूर्णपणे केला गेल्यास समाजाची उन्नती होईल व समाजाचा पन्नास टक्के घटक स्त्रिया असल्याने पुरुषांच्या बरोबरीने स्त्रियांचाही विकास झाला. तरच पूर्ण समाज विकसित होईल. त्यासाठी महिलांचा विकास किवा महिलांच्या सक्षमीकरणासाठी शासनाला विविध कायदे नियम अधिनियम, धोरणे, कार्यक्रम आखून महिलांचे सक्षमीकरण केले जात असल्याने महिलांचे नेतृत्त्व पुढे येत आहे. विशेषत: कौटुंबिक पातळीवरून निर्णय घेण्याच्या प्रक्रियेमध्ये महिलांचा सहभाग वाढल्याने महिला सक्षमीकरणाला बळकटी प्राप्त होत आहे. पुढे आर्थिक, राजकीय, सामाजिक व सांस्कृतिक क्षेत्रातही नेतृत्त्व करण्याची संधी मिळू लागल्याने महिलांचे सक्षमीकरण होत आहे. प्रस्तूत शोधनिबंधात त्याचा आढावा घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**संशोधनाचा उद्देश:**

१) महिला सक्षमीकरण ही संकल्पना समजावून घेणे,

२) महिलांच्या शैक्षणिक व राजकीय स्थितीचा आढावा घेणे.

३) ग्रामीण महिलांनाच्या सामाजिक स्थितीचा आढावा घेणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी शास्त्रीय संशोधनातील नियमांप्रमाणे तध्यसंकलन करताना दुय्यम तथ्यांचा आधार घेण्यात आला आहे. त्यासाठी विषयांशी संबंधीत संदर्भ ग्रंथ मासिके, इंटरनेट व वर्तमान पत्रातील बातम्या व लेख इत्यादीचा आधार घेण्यात आलेला आहे. व त्या आधारेच संशोधन विषयाचे विश्लेषण करण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**महिला सक्षमीकरण: एक संकल्पना:**

सक्षमीकरण ही एक बहुआयामी संकल्पना आहे. अशा व्यापक व गुंतागुंतीच्या स्वरुपामुळे महिला सक्षमीकरणाची नेमकेपणाने व्याख्या करता येत नाही. तरीही एखाद्याला त्यांच्या जीवनासंबंधीचे हक्क प्राप्त करुन घेण्यासाठीची पात्रता त्यांच्यात निर्माण करणे यालाच सक्षमीकरण असे म्हंटले जाते. सक्षमीकरण' ही दुर्बलता नष्ट करणारी संकल्पना आहे. १८८२ मध्ये ताराबाई शिंदे यांनी लिहिलेले स्त्रीपुरुषतुलना हे पुस्तक, खरे तर एक निबंध १९७५ मध्ये आंतरराष्ट्रीय महिला वर्षे आले तेव्हा खऱ्या अर्थाने महिला सक्षमीकरण प्रकाशझोतात आले. १९८० च्या दशकात सुरुवातीला महिला कल्याणांवर भर दिला गेला. याच दशकात स्त्री-पुरुष समानतेवर भर दिला गेला. पाच दशकाच्या शेवटी महिला सक्षमीकरण शब्दांचा प्रयोग करण्यात आला. कोणतेही राष्ट्र आपल्या राष्ट्रातील स्त्री-पुरुषांच्या विकासाद्वारेच राष्ट्रांचा सर्वांगीण विकास करु शकते. राष्ट्राच्या विकासामध्ये स्त्रीयांचा

विकास आणि त्याचे योगदान महत्त्वपूर्ण ठरते. स्त्रियांच्या विकासासाठी महिला सक्षमीकरण आवश्यक आहे .महिला सक्षमीकरण म्हणजे महिला केवळ शारीरिकदृष्ट्या निरोगी व सुदृढ असणे असे नाही. तर सामाजिक व अर्थिकदृष्ट्या स्त्रियांवरील अन्याय व अत्याचार दूर करून त्यांना न्याय मिळवून देणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय.

"महिलांना सामाजिक आर्थिक, राजकीय कौटुंबिक, मानसिक व प्रशासकीय क्षेत्रात योग्य प्रमाणात सहभागी करून घेणे म्हणजे महिला सक्षमीकरण होय असेही म्हंटले जाते."

जागतिक बँकने केलेली व्याख्या ,"व्यक्तींना किंवा गटांना आपली पसंती ठरविण्याची चारही पसंती इष्ट त्या कृतीमध्ये आणि फलप्राप्तीमध्ये उत्तरविण्याची क्षमता वाढविण्याची प्रक्रिया म्हणजे सक्षमीकरण होय."

"महिला सक्षमीकरण म्हणजे स्त्रिने स्वत: च्या क्षमतांची ओळख करुन क्षमतांचा विकास करावयाच्या घरगुती व सामाजिक निर्णयांच्या प्रक्रियेत सहभागी होण्याचा प्रयत्न करणे आहे ."

"महिला सक्षमीकरण म्हणजे आत्मविश्वासामध्ये वाढ, क्षमता-वृद्धी, सामाजिक जाणीव जागृती, कार्यात्मक साक्षरता, लिंगसमभाव, आरोग्य विषयक जाणीव, स्वतः आत्मसन्मानाने जगणे, आत्मनिर्भर व वित्तीय संस्थाबरोबर महिलांनी जोडणे होय."

लता बाटलीवालाच्या मत आहे-

स्त्रियांना सक्षम करणे ही एक प्रक्रिया आहे. ही प्रक्रिया स्त्रिला इतर उपेक्षित घटकांना दूर ठेवण्याच्या सुव्यवस्थीत प्रवाहाचे स्वरूप बदलून व नवी दिशा देवून कृतीत आणता येते. तेव्हा प्रामुख्याने स्त्रीला सक्षम करण्यासाठी तिला शक्ती देण्याचे प्रयत्न केले गेले तरच ती अधिक गतीने प्रगत होवु शकते.

थोडक्यात, महिला सक्षमीकरण ही प्रक्रिया स्त्रिया बद्दल सकारात्मक दृष्टीकोन निर्माण करणारी महिलांना भितीपासून मुक्त करणारी स्त्रियांमध्ये क्रांतीकारी विचार रुजवणारी, स्त्रियांना सामाजिक अर्थिक राजकीय व शौक्षणिक प्रक्रियेत सहभागी करुन घेवून त्यांना स्वावलंबी बनविणारी प्रक्रिया होय, असे म्हणता येईल.

**ग्रामीण महिलांची राजकीय स्थिती आणि सक्षमीकरण :**

अलीकडील काळात राजकीय दृष्ट्या स्त्रीयांमध्ये जागृती वाढू लागल्याने त्यांची राजकीय स्थिती आशादायक झाल्याचे चित्र दिसु लागते आहे. प्राचीन काळापासून चूल आणि मूल या मर्यादीत कार्यक्षेत्रात अडकलेल्या स्लियांना स्वातंत्र्योत्तर कालखंडात भारतीय राज्यघटनेने दिलेल्या आरक्षणामुळे राजकीय नेतृत्व करण्याची संधी प्राप्त झाली आहे. त्यामुळे महिलांच्या सक्षमीकरणाला गती प्राप्त झाली. सत्ता सहभागाशिवाय कोणत्याही समुहाचे सक्षमीकरण शक्य नसते. सत्ता असेल तर माणसाला आपल्या विचारांची पेरणी, नेतृत्व,कलागुण,कार्यकौशल्य करण्याला वाव मिळतो. त्यासाठी राजकीय क्षेत्रात स्त्रियांना संधी मिळाल्यास त्या नेतृत्त्व करण्यास सक्षम बनू शकतात.

पंचायत राज व्यवस्थेतील जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि ग्रामपंचायती या त्रिस्तरीय रचनेमुळे सत्तेचे विकेंद्रीकरण झाले. जनतेला स्थानिक प्रश्न आपल्याच पातळीवर सोडविणे शक्य झाले. ग्रामविकासाला चालना देण्यासाठी केलेल्या या प्रयत्नामुळे स्त्रियांना नाही राजकीय नेतृत्व करण्याची संधी प्राप्त झाल्याने राजकीय दृष्टया सक्षमीकरण घडून येत असल्याचे दिसून येत आहे. आज महाराष्ट्रात जिल्हा परिषदा, पंचायत समित्या आणि हजार ग्रामपंचायतीच्या माध्यमातून विकास साधताना वंचीत, उपेक्षीत दुर्लक्षीत व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांनाही नेतृत्व करण्याची संधी प्राप्त झाली आहे, विशेषतः महिलांसाठी राज्य शासनाने स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये आरक्षण लागू केले आहे. याशिवाय महिलांनी या संधीचा लाभ घेवून स्वबळावर आपले कर्तृत्व सिद्ध करावे व ग्रामविकासात योगदान द्यावे यासाठी क्रांतीज्योती प्रकल्प हाती घेतला आहे. स्वराज्य संस्थांच्या माध्यमातून महिलांना सामाजिक व राजकीयदृष्ट्या सक्षम करण्यासाठी हे पाऊल उचलले आहे. प्रथमच निवडून आलेल्या महिलांमध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा आणि इतर महिलांनी त्यांच्यापासून प्रेरणा घेवून स्वतः पुढे पायला हवे यासाठी प्रयत्न केले जात आहेत. ग्रामपंचायतीचा प्रत्यक्ष कारभार ज्वलंत सामाजिक समस्या व शासकीय योजनाची माहिती देवून स्लियांच्या एकंदरीत व्यक्तिमत्वाचा विकास व्हावा यावर भर दिला जात आहे.

७३ व्या घटना दुरुस्तीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये महिलांसाठी जागा राखून ठेवण्यात आल्या. तसेच पंचायत राज संस्थामध्ये महिलांना आरक्षण देण्याचा निर्णय शासनाने घेतला. परिणामी आज महाराष्ट्रातील काही जिल्हापरिषदेच्या अध्यक्षपदी महिलांना संधी मिळालेली दिसून येते, त्याचबरोबर महिला आरक्षणाची स्थिती पाहता समाधानकारक चित्र दिसून आले. आपल्या देशात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांची संख्या कमी आहे, असं आपण नेहमी ऐकत आलो आहोत; मात्र आता या स्थितीमध्ये बदल झाला आहे. 'नॅशनल फॅमिली अँड हेल्थ सर्व्हे'ने दिलेल्या ताज्या माहितीनुसार आता आपल्या देशात पुरुषांपेक्षा महिलांची संख्या जास्त आहे. सर्वेक्षणातल्या ताज्या आकडेवारीनुसार, देशात सध्या एक हजार पुरुषांमागे 1020 महिला आहेत. याशिवाय एकूण जन्मदरातही घट झाल्याचं सर्वेक्षणात म्हटलं आपल्या देशात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांची संख्या कमी आहे, असं आपण नेहमी ऐकत आलो आहोत; मात्र आता या स्थितीमध्ये बदल झाला आहे. 'नॅशनल फॅमिली अँड हेल्थ सर्व्हे'ने दिलेल्या माहितीनुसार आता आपल्या देशात पुरुषांपेक्षा महिलांची संख्या जास्त आहे. सर्वेक्षणातल्या ताज्या आकडेवारीनुसार, देशात सध्या एक हजार पुरुषांमागे १०२० महिला आहेत. याशिवाय एकूण जन्मदरातही घट झाल्याचं सर्वेक्षणात म्हटलं १९९० मध्ये १००० पुरुषांमागे महिलांची संख्या फक्त ९२७ एवढी होती. २००५-०६ मध्ये झालेल्या तिसऱ्या एनएफएचएस सर्वेक्षणात हे गुणोत्तर १०००-१००० असं बरोबरीत आलं होतं. त्यानंतर २०१५-१६ मध्ये झालेल्या चौथ्या सर्वेक्षणात ही आकडेवारी पुन्हा घसरली

होती. त्या वेळी १००० पुरुषांच्या तुलनेत स्त्रिया होत्या. आता करण्यात आलेल्या सर्वेक्षणात पहिल्यांदाच महिलांची संख्या पुरुषांपेक्षा जास्त झाली आहे समाज विकासाचा केंद्रीभूत घटक म्हणून त्याकडे ९९१ पाहिले जात आहे. स्त्री ही एक मौल्यवान मानव संसाधन असून देशाच्या शाश्वत विकासासाठी त्यांचा सामाजिक आर्थिक विकास अनिवार्य आहे. भारताच्या एकूण लोकसंख्येत स्त्रियांचे एकूण प्रमाण एवढे आहे परंतू आज स्त्री पुरुष असमानता, स्त्री भ्रूणहत्या, कौटूंबिक हिंसाचार, बलात्कार, विनयभंग यासारख्या समस्यांमुळे स्त्रीयांच्या सामाजिक दर्जाला क्षती पोहचत आहे. त्यावर उपाय म्हणून केंद्र आणि राज्य शासनाने महत्त्वपूर्ण पावलं उचलली आहेत. त्यामध्ये पित्याच्या संपत्तीत मुलींना वाटा देणारा कायदा, स्त्रीभ्रूणहत्या प्रतिबंधक कायदा, कौटुंबिक हिंसाचार प्रतिबंधक कायदा बचत गटांच्या माध्यमातून महिलांना आर्थिक तरतूद, शिक्षण आणि नो९९१कऱ्यामध्ये राखीव जागांची तरतूद, बेटी बचाव बेटी पढ़ाव योजना या सारख्या बाबींमुळे महिलांचे सामाजिकदृष्ट्या सक्षमीकरण घडून येत असल्याचे दिसते.

विशेषतः कौटूंबिक स्तरावरुन महिलांचे सर्वेक्षण केले असता असे दिसून आले आहे की, आज देशातील सुमारे महिला आपल्या कुटुंबातील निर्णय स्वतः घेत आहेत. देशातील राज्यासह केंद्रशासित प्रदेशात हा अभ्यास करण्यात आता तेव्हा स्त्री सक्षमीकरणाच्या अनेक बाबी दिसून आल्या. त्यानुसार गेल्या वर्षात विवाहीत महिलावरील अत्याचारात १५ ने घट झालेली आहे. हरियाणा सारख्या राज्यात अल्पवयीन मुलीचे विवाह दिसून येतात. खाजगी संपत्तीबाबत बिहारच्या महिला देशात आपाठीवर असलेल्या दिसतात. तेथे त्यांची संपत्ती आहे.

राष्ट्रीय ग्रामीण आरोग्य अभियानामुळे स्त्रियांच्या आरोग्यविषयक निर्देशांकामध्ये सुधारणा झाली आहे. भारतात १९६८ मध्ये महिलांसाठी प्रसूती काळात हक्काची रजा व १९७६ मध्ये समान वेतन कायदा मंजूर करण्यात आला. तसेच महिलांना प्रशिक्षण व रोजगार सहाय्यता कार्यक्रम १९८७ साली सुरु करण्यात आला. त्याचबरोबर स्वयंसिद्धा व स्वाधार योजना, माहेर योजना, दत्तक पालक योजना , महिला आर्थिक उद्योजकता महामंडळ,बालिका समृद्धी योजना , देवदासी पुनर्वसन योजना महिला बचत गट, सुवर्ण जयंती ग्राम स्वयंरोजगार योजना आदी विविध योजना वेगवेगळ्या विभागामार्फत राबविल्या जातात, महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठात व महाविद्यालयांमध्ये पदवी अभ्यासक्रमासाठी महिलांसाठी ३० टक्के आरक्षण ठेवण्यात आले आहे. मुलींसाठी सैनिकी शाळा स्थापन करण्यात आल्या आहेत. शासकीय कादपत्रांमध्ये पाल्यांच्या वडिलांसोबत आईच्या नावाचा उल्लेख सुध्दा केला जात आहे. महिलांसाठी सावित्रीबाई फुले योजना, मातृत्व अनुदान स्त्री, डॉक्टरच्या सेवा अशा अनेक योजना शासनाने महिला विषयक धोरणात जाहीर केल्या आहेत तसेच विविध प्रकारचे कायदे करून

स्रियांना संरक्षण मिळवून दिले जात असल्याने सक्षमीकरणाला गती प्राप्त होत आहे.

**निष्कर्ष :**

1. राजकारणातील व शैक्षणिक आरक्षणामुळे महिलांचे नेतृत्व उदयास येत आहे.
2. सामाजिक जाणीव जागृतीमुळे महिलांची सामाजिक स्थिती सुधारली आहे.
3. राजकीय क्षेत्र,शैक्षणिक क्षेत्र व शासकीय सेवेमध्ये जरी आरक्षण दिलेले असले स्रियांचा अपेक्षित असा राजकीय विकास झालेला नाही.
4. सामाजिकदृष्ट्या महिलांचे सक्षमीकरण होत असले तरी एकुण लोकसंख्येत लिंगगुणोत्तराचे प्रमाण विषम आहे.
5. ग्रामीण महिलांचे सक्षमीकरण होत असले तरी शैक्षणिक दृष्टीकोनातून महिलांची साक्षरता म्हणावी तेवढी वाढलेली नाही, महिला साक्षरतेचे प्रमाण एवढे अल्प आहे

**शिफारशी/अपेक्षा:**

ग्रामीण महिलांचे राजकीयव शैक्षणिक सक्षमीकरण घडवून आणण्यासाठी महिलांना सर्वच पातळीवर अधिकार देणे आवश्यक आहे.

**संदर्भग्रंथ :**


1. इंद्र शर्मा - महिला सक्षमीकरण के - नवीन आयाम - राधा पब्लिकेशन, नवी दिल्ली (२०११)
2. मीना केळकर - भारतीय स्री संरक्षण आणि प्रतिमा -निमित्त प्रकाशन,पुणे (१९९०)
3. डॉ. शुभांगी गोटे-गव्हाणे - महिला सबलीकरण स्वरुप व समस्या- वरद पब्लिकेशन्स, औरंगाबाद (२००४)
4. डॉ. लिला पाटील - भारतीय स्री जीवन- मेहता पब्लिशींग हाऊस, पुणे.
5. लोकराज्य - माहिती जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र शासन मुंबई (एप्रिल २०१२)
6. (२०१४) अतुल यशवंत पगार :सोशल वेल्फेअर -विकास पिडिया
7. महिला सक्षमीकरण समस्या आणि उपाय : प्रा. मा.डॉ. रेखा हिंगोले (माने), ईशा प्रकाशन, शिवाजी चौक, लातूर, पहिली आवृत्ती (२००६)